ISSN 2231-1629
Knowledge Resonance
IMPACT FACTOR 8.072
July – December 2021- Vol. 10 No. 2

# भविष्यातील भारत आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार

**डॉ. सागर लोकनाथ बडगे**

*समाजशास्त्र विभाग*

*मूळजी जेठा महाविद्यालय, जळगाव*

भारताच्या भविष्याविषयी अनेक सामाजिक-राजकीय विचारवंत, समाजसुधारक यांनी आपले विचार मांडले आहेत. त्यांचा विचारातून आपण उज्वल भारत पाहू शकतो अशा विचारवंतांमध्ये एक नाव गर्वाने घेतल्या जाते व ते म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर होय. बाबासाहेबांनी आपल्या संपूर्ण आयुष्यात अनेक लेख व ग्रंथाच्या माध्यमातून आपले विचार समाजासमोर मांडले आहेत. डॉ. बाबासाहेबांनी अर्थशास्त्र, इतिहास, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, मानववंशशास्त्र इत्यादी विषयांवर अनेक ग्रंथ लिहिले आहेत.

१. भारतीय जातीसंस्था, यंत्रणा, उत्पत्ती व विकास १९१६,
२. ब्रिटिश भारतातील प्रांतिक व अर्थशास्त्रीय उत्क्रांती १९२४,
३. भारतातील जाती १९२४,
४. अनिहीलेशन ऑफ कास्ट १९३७,
५. पाकिस्तान विषयी विचार १९४०,
६. शूद्र पूर्वी कोण होते १९४६,
७. द अनटचेबल्स १९४८,
८. थॉट्स ऑन लिंग्विस्टिक स्टेटस १९५५,
९. बुद्ध आणि त्यांचा धम्म १९५७,

इत्यादी. ग्रंथावरून आपल्याला त्यांच्या अभ्यासाची गहनता लक्षात येते.

**अभ्यासाचे उद्देश:**

१. डॉ. बाबासाहेब यांच्या अभ्यासाचा दृष्टिकोन हा भारताला एक आदर्श समाज निर्माण करणे हा होता.
२. डॉ. बाबासाहेबांचे विचार आणि कृतीतून समाजात समानता, न्यायता, एकता व बंधुता प्रस्थापित करणे हा होता.

**भारताच्या भविष्याविषयी बाबासाहेबांचे जाती निर्मूलन विषयक विचार** :

जाती व्यवस्थेचे वास्तव स्वरूप मांडतांना बाबासाहेब म्हणतात, 'जाती व्यवस्था म्हणजे श्रम विभाजनाचे दुसरे नाव आहे व विभाजन हे प्रत्येक सभ्य समाजाचे आवश्यक अंग आहे. जाती व्यवस्थेमध्ये वाईट असे काही नाही, असा युक्तिवाद करून तिचे समर्थन केले जाते. पण या मताच्या विरुद्ध माझा आक्षेप असा आहे की, जातीव्यवस्था ही केवळ श्रमविभाजन नव्हे तर ते श्रमिकांचेही विभाजन आहे. बाबासाहेब पुढे सांगतात की, भारतातील जाती व्यवस्थेमुळे कनिष्ठ मानल्या गेलेल्या जातीचे शोषण झाले आहे. डॉ. बाबासाहेबांच्या मते जाति प्रथेचे निर्मूलन करावे तरी कसे याबाबत काही मुद्दे ते सांगतात.

१. जातिव्यवस्थेच्या निर्मूलनासाठी जातीच्या विसर्जना शिवाय दुसरा उपाय प्रभावी ठरू शकणार नाही, जे आंतरजातीय विवाहाने शक्य होऊ शकेल.

२. लोकांना जात-पात सोडण्यास सांगणे म्हणजे त्यांना त्यांच्या मूळ धार्मिक धारणा आणि मान्यतांच्या विपरीत वागण्यास सांगणे होय. यासाठी शास्त्रज्ञांचे दैवत्व, शास्त्र आणि वेदांची सत्ताह समाप्त करणे आवश्यक आहे.

३. प्रत्येक देशात बुद्धिजीवी वर्ग हा सर्वाधिक प्रभावी असतो, तो शासक नसला तरी तो दूरदर्शी असतो, मार्गदर्शक असतो, व नेतृत्व करणारा असतो. परंतु दुर्दैवाने भारताचा बुद्धजीवी वर्ग म्हणजे ब्राह्मण जातीचे दुसरे नाव आहे. ज्याचा उर्वरित हिंदू खूप आदर करतात आणि परिणामी स्वतःचे श्रेठत्व समाप्त करावे असे त्यांना कधीच वाटणार नाही. जातीव्यवस्थेत लोक वेगवेगळ्या समुदायात विभाजित असून आपल्यापेक्षा कनिष्ठ कोणीतरी आहे, यातच प्रत्येक जातीला समाधान वाटते. बाबासाहेबांच्या मते, जातिप्रथेच्या श्रेणी कारणाने आणि सोपान पद्धतीने जाती व्यवस्थेविरुद्ध सामूहिक बंद उभे करणे आवश्यक आहे.

४. डॉ. बाबासाहेब सांगतात की, हिंदू धर्मामध्ये आवश्यक ती सुधारणा होणे आवश्यक आहे कारण हिंदू ज्याला धर्म म्हणतात तो केवळ आदेश आणि निषेध यांनी बरबटलेला आहे . बाबासाहेब म्हणतात लोकांना हे सांगणे आवश्यक आहे की हिंदू धर्म हा धर्म नसून कायदा आहे. तेव्हा लोक स्वतः त्याला स्वीकारण्याचा स्थितीत असतील कारण कायद्यात परिवर्तन केले जाऊ शकते.

५. बाबासाहेब सांगतात धर्म समाजाची आधारशिला आहे, ज्यावर नागरिक सरकार टिकून आहेत. म्हणून धर्मात असणारी असमानता व अन्यायाचे प्रतीक असणारे सिद्धांत नष्ट करून त्या ऐवजी नवीन सिद्धांत लागू करावेत.

जाती निर्मूलनाबाबतचा इतर विचारांपेक्षा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार आजही प्रासंगिक आहेत. कारण आजही जातीप्रथेने हिंदू समाजाला पोखरले आहे. तसेच देशाच्या एकता आणि अखंडतेसाठी बाधक ठरली आहे. बाबासाहेब म्हणतात सरकारचा उद्देश भूतकाळातील केलेल्या चुकांना सुधारणे हाच असावा. जोपर्यंत समाजात भेदभाव व विषमता अस्तित्वात असेल तोपर्यंत विकास घडून येणे शक्य नाही.

**राष्ट्रीय एकात्मतेबाबतचे डॉ. बाबासाहेबांचे विचार :**

पहिल्या गोलमेज परिषदेत डॉ. बाबासाहेबांनी भारताच्या सार्वभौमत्वाचा एकराष्ट्रीयत्वाचा विचार मांडला होता. 'भारतामध्ये एक केंद्रीय शासन आवश्यक आहे. कारण ही शासन पद्धतीच भारत हे एक राष्ट्र आहे' ही भावना वाढवण्यास उपयोगी ठरते. एक केंद्रीय शासन पद्धतीमुळेच भारतात राष्ट्रवृत्ती वाढीस लागली आहे. राष्ट्रीय एकात्मता केवळ राजकीय नसते, ती आत्मिक व सांस्कृतिक एकात्मता असते. तसेच बाबासाहेब म्हणतात की, 'भारत हे अद्याप राष्ट्र बनवायचे आहे, सामाजिक, मानसिक आणि भावनिक दृष्ट्या आपण अद्यापही राष्ट्र झालेले नाही. ही बाब भारतीयांना लवकर समजेल, तितकेच बरे होईल' हे वाक्य म्हणजे त्यांच्या राष्ट्रीय प्रेमाची साक्ष होय. भारताची राष्ट्रीय एकात्मता कायम राखण्यासाठी डॉ. बाबासाहेबांनी राष्ट्रध्वजावर धर्मनिरपेक्षतेचे प्रतिक म्हणून तिरंगा ध्वजावर त्यांनी अशोक चक्र अंकित केले. भारताचे संविधान हे राष्ट्र उभारणीचा जाहीरनामा आहे. त्याच बरोबर प्रजासत्ताक राज्य निर्मिती करिता त्यांनी सामाजिक, राजकीय, आर्थिक आणि सांस्कृतिक ह्या मुक्ती संग्रामाच्या चार आघाड्या स्वीकारल्या. त्याकरिता राज्यसत्ता वापरतांना मार्गदर्शक तत्त्वांचे पालन राज्यकर्त्यांनी केले पाहिजे, असेही ते सांगतात. ते म्हणतात की, 'प्रजातंत्र चांगल्या प्रकारे चालवण्यासाठी आणि राष्ट्रीय एकात्मता कायम ठेवण्यासाठी भारतीयांच्या जीवनातील सांप्रदायिकता समाप्त केली पाहिजे. 'भारतातील जाती ह्या देशविघातक आहेत व भारत हे राष्ट्र म्हणून निर्माण होऊ शकेल यात शंका आहे, हा त्यांचा विचारांचा एक नवा सिद्धांत आहे.

२४ जानेवारी १९५० रोजी घटना समितीतील आपल्या शेवटच्या भाषणात इशारा देताना ते सांगतात. 'आपल्यातील विघटितपणामुळे व फितुरी वृत्तीमुळे आपण आपले स्वातंत्र्य गमावले होते, तशी इतिहासाची पुनरावृत्ती होता कामा नये. जर तसे झाले तर पुन्हा आपण स्वतंत्र गमावू आणि ते कायमचेच गमवावे लागेल. यासाठी रक्ताच्या शेवटच्या थेंबापर्यंत आपण आपल्या देशाचे रक्षण केले पाहिजे. देशाचे ऐक्य व लोकशाहीच्या संवर्धनाच्या दृष्टीने बाबासाहेबाचे उद्गार हे किती मोलाचे आहेत याचा प्रत्यय येतो.

**शिक्षणाबाबतचे डॉ. बाबासाहेबांचे विचार :**

डॉ. बाबासाहेब शिक्षण वेडे होते, त्यांनी शिक्षणाला जीवनात अनन्यसाधारण असे महत्त्व दिले होते. त्यांनी वेगवेगळ्या उदाहरणांच्या द्वारे विद्येचे महत्व समाजाला पटवून सांगितले. ते म्हणतात ज्याप्रमाणे मनुष्यप्राण्याला अन्नाची आवश्यकता आहे त्याचप्रमाणे सर्वांना शिक्षणाची म्हणजेच विद्येची आवश्यकता आहे. ही विचारसरणी प्रथम तथागत भगवान गौतम बुद्धाने या भूतलावर सुरू केली. बाबासाहेब शिक्षणाला अनेक उपमा देतात ते शिक्षणाला दुधारी तलवार असे म्हणतात तिने दुष्टांचा संहार ही करता येतो व दृष्टांन पासून आपले संरक्षण ही करता येते. शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे असेही ते म्हणतात. बाबासाहेबांनी शिक्षणासोबत शिल याला ही महत्व दिले आहे. शीला शिवाय शिक्षणाची किंमत शून्य आहे, असे ते मानतात. ज्ञान हे तलवारीसारखे आहे. एखादा शिकलेला माणूस आपल्या ज्ञानाचा उपयोग लोकांच्या कल्याणासाठी करेल परंतु त्याचे शिल चांगले नसेल तर तो आपल्या ज्ञानाचा उपयोग लोकांचे अकल्याण करण्यासाठीही खर्च करू शकतो. बाबासाहेबांनी समाजामध्ये शिक्षणाचे महत्व लक्षात घेता, औरंगाबाद येथे मिलिंद महाविद्यालय तर मुंबई येथे सिद्धार्थ महाविद्यालयाची स्थापना केली. या महाविद्यालयांमधून शिकलेली विद्यार्थी हे आज राज्याच्या आणि देशाच्या उच्चपदावर काम करू लागली यामध्ये खासदार, आमदार, न्यायाधीश, जिल्हाधिकारी, प्राध्यापक, वकील, डॉक्टर, अध्यक्ष, आयुक्त, कुलगुरू, व योजना आयोगाचे सदस्य आणि इतर महत्त्वाच्या पदांवर आज काम करताना दिसून येत आहे. याच्या माध्यमातून ते नवसमाजाला शिक्षणाबाबत चा एक नवीन मंत्र देऊन गेले तो म्हणजे शिका, संघटित व्हा व संघर्ष करा.

शिक्षण हे समाज परिवर्तनाचे एक प्रभावी साधन आहे परंतु समाज परिवर्तनाची दिशा कोणती असावी हे निश्चित केल्याशिवाय त्याचा अचूक आणि परिणामकारक उपयोग करता येत नाही.

**लोकशाही बाबत डॉ. बाबासाहेबांचे विचार :**

बाबासाहेबांनी लोकशाही यशस्वी होण्यासाठी काही महत्वाचे मुद्दे सांगितले आहे.

१. लोकशाही यशस्वी व्हायची असेल तर, समाजात श्रेष्ठ-कनिष्ठ असे भेद नसावेत.
२. लोकशाही चिरायू करण्यासाठी दुसरी संजीवनी म्हणजे विरोधी राजकीय पक्ष, राज्यकर्त्यांचा एक पक्ष आणि विरोधकांचा एक पक्ष या दोन्ही खांबावर लोकशाहीचा राजवाडा उभा राहतो.
३. कायदा आणि राज्यकारभार यांच्या पुढे सर्वांना समसमान लेखणे.
४. संसदीय नितीमत्ता आणि सारासार विचार शक्ती याचे काटेकोरपणे पालन करावे.

**भारतीय स्त्री व बाबासाहेबांचे विचार :**

बाबासाहेबांना मनुवादी विचार व्यवस्थेचे चटके बसल्याने त्यांनी धर्म चिकित्सा करताना स्त्री शूद्रांच्या दास्यांची कारणे शोधण्याचा प्रयत्न केला. 'शूद्र पूर्वी कोण होते' हिंदू स्त्रियांची अवनती या विषयाची त्यांनी शास्त्रीय विवेचन केले. डॉ. बाबासाहेबांनी स्त्रीमुक्ती मार्ग तीन घटकांवर आघात करून

मांडला आहे, त्यांच्या मते जात वर्ण व पुरुष सत्ता हे तीन घटक स्त्रीचे शोषण करतात. म्हणून स्त्रीला गुलामगिरीतून मुक्त व्हायचे असेल तर, विवाहविषयक नियमांची तोडफोड केली पाहिजे. आंतरराष्ट्रीय विवाह केले पाहिजे. अशी केवळ मांडणी बाबासाहेबांनी केली नाही तर प्रत्यक्ष जीवनात याचा अवलंब देखील केला आहे. भारतातील जाती, उत्पत्ती आणि यंत्रणा या शोधनिबंधामध्ये (१९१५) ब्राह्मण समाजाने विधवा स्त्रियांना विवाह करण्याची मनाई केली असल्याचे बाबासाहेबांनी या ग्रंथात दाखवून दिले. मुलांच्या शिक्षणासोबत आम्हाला, मुलींच्याही शिक्षणाचा गांभीर्याने विचार करावा लागेल आणि त्यानुसार कृती करावी लागेल. भारतीय स्त्रियांच्या गुलामीला कारण असलेला मनुस्मृतीचे २५ डिसेंबर १९२७ रोजी महाड येथे ते दहन करून, हिंदू स्त्रियांना व शूद्रांना या जाचक बंधनातून मुक्त केले. २३ ऑक्टोबर १९२८ रोजी त्यांनी सायमन कमिशन पुढे साक्ष देताना 'वयात आलेल्या सर्व स्त्री-पुरुषांना मताधिकार असावा' अशी सर्व प्रथम मागणी त्यांनी केली सक्षम शिक्षण दिल्याने, त्यांच्यात जागृतीही निर्माण होईल. तसेच त्या नोकरी व्यापार आणि औद्योगिकीकरणात प्रत्यक्ष भाग घेऊन सामाजिक अर्थकारणात महत्त्वाच्या भूमिका बजावतील अशी बाबासाहेबांची धारणा होती.

बाबासाहेबांनी कुटुंबनियोजनाचे महत्त्व उघडपणे आणि स्पष्ट शब्दात महिलांना सांगितले ते म्हणाले लग्न लहान वयात करू नका. तसेच लग्नानंतर जास्त मुले देखील जन्माला घालने म्हणजे अपराध आहे. हे लग्न करणाऱ्यांनी देखील लक्षात ठेवावे. स्त्रिया समाजातील प्रचलित असलेल्या अनिष्ट आणि घातक रूढी नष्ट करून शकतात. त्याचबरोबर बाबासाहेबांनी स्त्रियांमध्ये आत्मविश्वास जागविला.

**राज्य समाजवाद बाबत डॉ. बाबासाहेबांचे विचार** :

डॉ. बाबासाहेबांनी अखिल भारतीय शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनच्या वतीने १५ मार्च १९४७ रोजी घटना समितीला एक मेमोरेंडम सादर केले होते, यामध्ये पुढील मुद्दे स्पष्ट केले.

१. जे उद्योग प्रमुख आहेत किंवा जे उद्योग प्रमुख पायाभूत म्हणून जाहीर करण्यात आले आहेत, असे उद्योग राज्याच्या मालकीचे असावेत आणि ते राज्याद्वारेच चालविले जावे.
२. जे उद्योग प्रमुख नाहीत, असे उद्योग राज्याच्या मालकीचे असावे आणि राज्याद्वारे किंवा राज्यात स्थापन केलेल्या मंडळाद्वारे चालविण्यात यावे.
३. विमा हा राज्याचा एकाधिकार असावा.
४. शेती हा राज्याचा उद्योग असावा.

अशाप्रकारे डॉ. बाबासाहेबांनी देशात आर्थिक समता आणण्याच्या दृष्टीने एक अतिशय क्रांतिकारी कार्यक्रम मांडला होता. या योजनांमुळे आर्थिक जीवनाच्या महत्त्वपूर्ण क्षेत्रात राज्य समाजवाद सुचवण्यात आला होता.

**लोकसंख्यावाढीबाबत डॉ. बाबासाहेबांचे विचार** :

अर्थशास्त्रज्ञ आणि दूरदृष्टी असलेले डॉ बाबासाहेबांना वाढत्या लोकसंख्येच्या प्रश्नाची जाणीव होती. भारतातील दारिद्र्याचे एक प्रमुख कारण म्हणजे वाढती लोकसंख्या आहे ही बाब त्यांनी ओळखली होती. लोकसंख्या वाडीतून दारिद्र्य वाढेल याची दूरदृष्टी कोनातून बाबासाहेबांनी २ मार्च १९३८ ला विधिमंडळात दारिद्र्याचा प्रश्न सोडवणे हे शासनाचे प्राथमिक कर्तव्य असल्याचे स्पष्ट केले होते. परंतु बाबासाहेबांच्या मांडलेल्या ठरावाला ५२ विरुद्ध ११ मतांनी फेटाळण्यात आले होते. १९७० नंतर जेव्हा वाढत्या लोकसंख्येच्या गंभीर परिणाम देशावर पडू लागले तेव्हा भारत सरकारने लोकसंख्यावाढीच्या समस्येचा विचार करून कुटुंब नियोजनाला प्रोत्साहन दिले. २०११च्या जनगणनेनुसार भारताची लोकसंख्या १२१ कोटी इतकी आहे. लोकसंख्येच्या नियंत्रणाच्या संदर्भात बाबासाहेबांनी १९३८ मध्ये मांडलेल्या विचारांवरुन त्यांच्या विचारांची दूरदृष्टी लक्षात येते.

**विकासाची अर्थनीती बाबत बाबासाहेबांचे विचार** :

स्वातंत्र्योत्तर काळामध्ये भारतीय अर्थव्यवस्थेसाठी विकासाच्या अर्थनीती बाबत विवेचन त्यांनी 'स्टेटस अँड मॉयनारिटीज' या ग्रंथात केले. त्यांनी गरिबी हटविणे, विषमता निर्मूलन आणि शोषण मुक्तता या तत्त्वाचा आग्रह धरला होता. बाबासाहेब सांगतात की, खाजगी उद्यमशीलतेला धक्का न लावता जनतेची उत्पादकता जास्तीत जास्त राहील आणि संपत्तीचे वाटप समानतेने होईल अशा पद्धतीने आर्थिक व्यवहारांचे नियोजन करणे, ही राज्यसंस्थेची जबाबदारी आहे. शेत जमीन आणि अवघड उद्योगधंदे यावर सामुदायिक मालकी असावी अशी त्यांची धारणा होती. शेतजमिनीचे राष्ट्रीयकरण करून सामुदायिक लागवड करावी आणि उत्पादनाचे लोकशाही पद्धतीने जातीभेद न करता वाटप करावे म्हणजेच गरिबांना न्याय देता येईल, अशी बाबासाहेबांची भूमिका होती.

**डॉ. बाबासाहेबांचे भारतीय शेती विषयक विचार** :

लहान धारण क्षेत्रे भारतीय शेतीला भेडसावणारी गंभीर समस्या आहे. केवळ ही लहान धारणक्षेत्रच नाही तर ती वेगवेगळ्या ठिकाणी विखुरलेली आहे. त्यामुळे ही समस्या अधिक बिकट झाली असल्याचे बाबासाहेबांनी स्पष्ट केले. जमिनीच्या विभाजनाचे प्रमुख कारण हे वारसा हक्क आहे. त्यांच्या मते जमिनीवर पडत असलेल्या लोकसंख्येचा प्रचंड भार हे त्याचे मुख्य कारण आहे. बाबासाहेब स्पष्टपणे नमूद करतात की, लहान धारण क्षेत्रांचे आकारमान मोठे करणे हा भारतातील शेती समस्येवर उपाय नसून भांडवल व इतर

साधनसामग्रीची उपलब्धता वाढविणे हा खरा उपाय आहे. भारतातील शेतीचे प्रश्न सोडवण्यासाठी औधोगिकरण हा एकच खात्रीलायक उपाय आहे.

१७ सप्टेंबर १९३७ रोजी बाबासाहेबांनी मुंबई कायदेमंडळात 'खोती पद्धत' रद्द करण्यास संबंधित विधेयक मांडले होते. रयतवारी पद्धतीत जो जमीन कसतो त्याच्याकडून सरकार जमीन महसूल गोळा करते, परंतु खोती पद्धतीत खोत जमीन महसूल गोळा करून सरकारला देत. कुळे आणि सरकार यांच्यात प्रत्यक्ष संबंध येत नसे. खोती पद्धत रक्त शोषण करीत असून ही पद्धत नाहीशी केल्याने शांतता आणि प्रगती साधेल असे मत होते व जमीन कसणाऱ्यां कुळाचे वहिवाटीचा हक्क मिळावेत आणि रयतवारी पद्धत आणावी हा या विधेयकाचा मुख्य उद्देश होता.

वरील विचारांचा आढावा घेतल्यास असे लक्षात येते की, भविष्यातील भारत कसा असावा.

निष्कर्ष :

१. आजही जाती प्रथेने हिंदू समाजाला पोखरले आहे, तसेच देशाच्या एकता आणि अखंड ते साठी घातक ठरलेली आहे. समाजात भेदभाव व विषमता अस्तित्वात असेल तोपर्यंत विकास घडून येणे शक्य नाही.
२. एक केंद्रीय शासन पद्धती मुळेच भारतात राष्ट्रवृद्धि वाढीस लागली आहे, तसेच राष्ट्रीय व सामाजिक ऐक्याच्या दृष्टीने भारतात एकाच भाषेचा म्हणजे हिंदी भाषेचा आग्रह धरला गेला आहे.
३. सामाजिक बांधिलकी नसलेल्या दिशाहीन राष्ट्रातील शिक्षण माणसाला स्वार्थी, अहंकारी आणि मूर्ख सुद्धा बनवू शकतो. बाबासाहेबांचा शिक्षण विषयीचा हाच दृष्टिकोन संपूर्ण भारतात राबवणे गरजेचे आहे, असे लक्षात येते.
४. लोकशाही समाजात श्रेष्ठ - कनिष्ठ असा भेद नसावा. विरोधी राजकीय पक्ष असावा. कायदा आणि राज्यकारभार याच्यापुढे सर्वांना समान लेखण्यात यावे. आणि संसदीय नीतिमत्ता याचे काटेकोरपणे पालन करणे याला बाबासाहेबांनी महत्त्वाचे मानले.
५. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे महिलांच्या शिक्षणाबाबत त्यांचे अंतिम उद्देश स्त्रियांना कायद्याने हक्क, अधिकार, दर्जा, प्रतिष्ठा व मानसन्मान प्राप्त व्हावे हेच होते.
६. राज्याच्या उद्योगावर संपूर्णपणे समाज आणि राज्याचे चे नियंत्रण असावे आणि विमा हा राज्याचा एकाधिकार आणि शेती हा राज्याचा उद्योग असावा असे, मत बाबासाहेबांनी मांडले.
७. लोकसंख्यावाढीतून दारिद्र वाढेल यामुळे लोकसंख्या वाढीवर ती नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे.
८. लहान धारण क्षेत्रे ही भारतीय शेतीला भेडसावणारी गंभीर समस्या आहे.

**संदर्भ :**

*१. गायकवाड प्रदीप, 'धम्मचक्र प्रवर्तनय डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची बौद्ध धर्मावरील भाषणे व लेख' २००८ समता प्रकाशन, नागपूर*
*२. खैरमोडे चां. भां., 'डॉ. भीमराव रामजी आंबेडकर चरित्र खंड अकरा' १९९०, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि सांस्कृतिक मंडळ, मुंबई.*
*३. कसबे रावसाहेब, 'शिक्षणाची आव्हाने' २००२ सुगावा प्रकाशन. पुणे.*
*४. कराळे जगन्नाथ, 'धम्मक्रांतीची फलश्रुती' २००६, तक्षिला प्रकाशन, पुणे.*
*५. निंबाळकर वामन, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारधारा' २००६, प्रबोधन प्रकाशन, नागपूर.*
*६. पाटील निरंजन, 'आंबेडकरी तत्व विचार दिशा आणि संघर्ष' २००८, बुद्धिस्त सोसायटी ऑफ इंडिया, मुंबई.*
*७. पवार दया, (संपादक मंडळ) 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ' २००६, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.*
*८. पाटील आनंद, सामान्य क्षमता चाचणी' २००६, स्टडी सर्कल, मुंबई.*